# जल हेच जीवन

जल हेच जीवन आहे. जलाशिवाय जीवन अशक्य आहे. अन्नाशिवाय काही काळ तरी जिवंत राहता येईल. पण पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही पुरातन काळापासून मानवाने पाण्याच्या सहवासाने जीवन सुरु केले नदीच्या काठावरच तो वस्ती करुन राहू लागला. नदीला देवता मानून तिची पूजा करु लागला. हळूहळू आपल्या बुद्धि सामर्थ्याने विकासाचे पंख लावून अवकाशात भरारी मारणाऱ्या माणसाला पाण्याचे व पर्यायाने पंचमहाभूताच्या अद्भूत शक्तीचे महत्व वाटेनासे झाले. पाणी म्हणजे $2H_2 + O_2 = 2H_2O$ हायड्रोजन व ऑक्सीजन यांचा संयोग म्हणजे पाणी एवढाच अर्थ जाणवू लागला तेथूनच ही जलदेवता रुष्ट होत गेली.

आज विज्ञानाच्या अतिभव्य प्रगतीमुळे मानव उन्नतीच्या शिखरावर पोचला आहे. परंतु प्रत्येक देश आज जलसंकट, वायुसंकट व पर्यावरणाच्या संकटाने मोकळा श्वास घेण्यासाठी झगडत आहे. द. आफ्रिकेतील केप टाऊन प्रमाणे अनेक शहरे महानगरे पाण्या अभावी तहानलेले आहेत.

काही दशकापूर्वीचे आपल्या पुण्यनगरीचे सौंदर्य नजरेसमोर आणून बघा. मुळा मुठा नद्यांचा रत्नजडीत सुवर्ण मेखला ल्यायलेले पुणे किती जलसमृद्ध होते. दुथडी वाहणाऱ्या ह्या जीवनदायिनी नद्या, त्यांना चारीदिशेने डोंगर कड्याकडून खळाळत, उड्या मारत येऊन मिळणारे ओढे, नाले, सह्याद्रिच्या उंच सुळक्यावरुन कोसळणारे स्वच्छ शुभ्र पाण्याचे प्रवाह, त्यामुळे आलेली हिरवीगार वनराई, नदीच्या काठावर डोलणारी पिके, उंच विशाल डेरेदार वृक्षसंपदा असे निसर्ग संपन्न पुण्याचे स्वरुप होते. आजची स्थिती विपरित आहे. नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांना सिमेंट क्रॉक्रीटची तटबंदी करुन अरुंद केले आहे. बंदिस्त केले आहे. नदीचे विशाल पात्र व काठावरील वाळूची पुळण हे वर्णन आता पुस्तकापुरते मर्यादित झाले आहे. उरलेल्या नदीपात्राला आपणच प्लस्टीक कचरा व राडारोडा टाकून आणखी विद्रुप करण्याचा प्रयत्न करतो आहे. ही स्थिती भयावह आहे. नजरेच्या टप्प्यात येऊन ठेपलेल्या जल संकटाचे अक्राळ विक्राळ रुप आपल्याला जाणवत नाही ही स्थिती विनाशकारक आहे.

पिके, उंच डेरेदार वृक्षसंपदा असे निसर्ग संपन्न स्वरूप पुण्याचे होते. आजची स्थिती विपरीत आहे. नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांना सिमेंट ~~क्रांक्रीट~~ क्रांक्रीटची तटबंदी करून अरुंद केलेले आहे. बंदिस्त केलेले आहे. उरलेल्या नदीपात्राला आपणच प्लॅस्टीक कचरा व राडारोडा टाकून आणखी निरूप करण्याचा ~~प्र~~ प्रयत्न करतो आहे. ही स्थिती भयावह आहे. नजरेच्या टप्प्यात येऊन ठेपलेल्या जलसंकटाचे अक्राळ विक्राळ रूप आपल्याला जाणवत नाही. ही स्थिती विनाशकारक आहे.

आपल्या देशात I.T. हब म्हणून ओळखले जाणारे बंगळूर शहर आज पाण्याच्या थेंबा थेंबा साठी कासाविस झालेले आहे. कमी अधिक प्रमाणात बहुतेक मोठी शहरे व ग्रामीण भागही याच संकटाच्या विळख्यात गुरफटलेला आहे. भौतीक सुखाच्या आत्यंतिक लालसेने झपाटलेला माणूस शेख चिल्लीच्या कथेप्रमाणे स्वतःच स्वतःच्या पायावर घाव ~~घ~~ घालतो आहे. मोठमोठ्या टोलेजंग इमारती, सिमेंट क्रांक्रीटचे रस्ते, अपरिमित वृक्षतोड, डोंगरांचे सपाटीकरण, घरामध्ये आलिशान मोठमोठी स्नानगृहे, पोहण्याचे तलाव व पाण्याचा गैर वाजवी वापर ~~सामुळे~~ कमी झालेले पर्जन्यमान कृषी उत्पादनात झालेली घट. त्यामुळे ~~वाढलेली~~ बेसुमार वाढलेली महागाई असे दुष्टचक्र सुरु झालेले आहे. याचा केंद्रबिंदू मानवाच्या आत्यंतिक भोग विलासी प्रवृत्तीत आढळतो. निसर्गाला आवळून, त्यावर कुरघोडी करून कोणीही सुखी होऊ शकत नाही.

अवकाशातील ग्रह ताऱ्यांना गवसणी घालतांना प्रथम आपली पाऊले जमिनीवर भक्कम असावी लागतात हे आपण विसरतो आहोत. निसर्गाचा असमतोल, तापमानात झालेली प्रचंड वाढ, अपुरा जलसाठा हा फार मोठा धोका आहे. तो वेळीच जाणून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी पुन्हा निसर्गाकडे वळून आपली जीवनशैली निसर्गानुकुल केली पाहिजे. तो वरुणराजा सहस्त्र धारांनी अमृत वर्षाव करतो. त्या पाण्याला अडवून जमिनीत जिरवून भूजल साठा वाढविला पाहिजे. पाण्याच्या अमर्याद वापरावर मर्यादा घातली पाहिजे. जल व्यवस्थापन कार्यक्षम करावे लागेल. वृक्षलागवड व वृक्ष संवर्धन हे अत्यावश्यक केले पाहिजे. नदी, नाले, विहिरी तलाव व इतर जलस्त्रोत प्रदुषण विरहित झाले पाहिजेत. पाण्याचा पुनर्वापर करण्याची सुधारित पद्धती उपयोगात आणली पाहिजे. सिंचन व्यवस्था प्रगतीशील केली पाहिजे. यासाठी जनजागृती करून सामुदायिक जागरुकता निर्माण झाली पाहिजे.

अशा तऱ्हेने वेळीच सावध होऊन कार्यसिद्धि साठी तत्पर झालो तर आपण येणाऱ्या जलसंकटावर निश्चितच मात करु शकू. व या वसुंधरेला पुनश्च सुजलाम सुफलाम करु शकतो. शकू. चला तर... आपण स्वतः पासूनच सुरुवात करु या.

जल हेच जीवन आहे

— o —

सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर भाग १
कोथरुड पुणे 9405438939

— o —